**आर. सी. सी. क्रं. १६०००५५/२०१४**
**सरकार वि. विजय व इ.**
**नि क्र. ११९**

**अभियोगपक्षातर्फे सा.क्र. ०७ यांची जबानी**
**शपथेवर निवेदन करतो की,**
**नाव** — रघूनाथ वसंत शेगर,
**वय** – ४९ वर्षे, व्यवसाय – पोलिस निरीक्षक,
**नेमणुक** — दिंडोरी पोलिस स्टेशन, नाशिक.

**<u>सरतपास अभियोग पक्षातर्फे सरकारी वकिल श्री. एन. पी. मोरे यांच्या मार्फत</u>**

१. दिनांक ०८/१०/२०१३ रोजी मी चांदवड पोलिस स्टेशन येथे पोलिस उप–निरीक्षक म्हणुन कार्यरत होतो. तलाठी चांदवड यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन नोंद झालेल्या गुन्हयाचा तपास माझ्याकडे आला होता. फिर्यादीसोबत मंडळ अधिकारी यांनी केलेला पंचनामा, पिडीतांचे सातबारा उतारे, तहसिलदार चांदवड यांचा आदेश प्राप्त झाला होता. त्यानंतर मी घटनास्थळी जाउन पंचनामा केला होता. आता मला पंचनामा दाखविण्यात आला. त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. त्याला **नि. क्रं. १२०** देण्यात आला. मी घटनास्थळाचे छायाचित्र फोटोग्राफर बोलवून काढूण घेतले होते. आता साक्षीदाराला वस्तु – अ वरील एकूण ११ छायाचीत्र दाखविले. साक्षीदाराने ते ओळखले. मी पिडीतांचे जवाब नोंदवले. मी पाच आरोपींना अटक केली होती. आता मला अटक फॉर्म दाखविले. त्यावर माझ्या व पंचांच्या सहया आहेत. त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. त्याला अनुक्रमे **नि. क्रं. १२१ ते १२५** देण्यात आला. मी उपप्रादेशीक परिवहन अधिका–यांना पत्र दिले होते. आता मला ते पत्र दाखविले. त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. त्याला **नि. क्रं. १२६** देण्यात आला. त्या पत्रावर उपप्रादेशीक परिवहन अधिका–याने आशीर्वाद इलेक्टीकल हार्डव्हेअरचे प्रोप्रायटर शिंदे यांचे मालकीचे असल्याबाबत लिहूण दिले होते. मी भूमी अभिलेख कार्यालयाला पत्र दिले होते. त्यावरुन त्यांनी मोजणी फी भरल्याशिवाय हद्दी निश्चीत करता येत नसल्याबाबत पत्र दिले होते. आता मला ते पत्र दाखविले. त्याला **नि. क्रं. १२७** देण्यात आले. मला तपासात पुरावा मिळून आल्याने दोषारोपत्र दाखल केले. आरोपींना पाहिल्यास ओळखू शकतो. आरोपी आज न्यायालयात हजर आहेत.

**सरतपास पुर्ण.**

<u>**उलटतपास आरोपीतर्फे विधीज्ञ श्री. पी. एस. कोतवाल यांच्यामार्फत**</u>

२. हे म्हणणे खरे नाही की, घटनेच्या तपासाबाबत वरिष्ठांचे कोणतेही आदेश मला नव्हते. हे मला सांगता येणार नाही की, वरिष्ठांचा आदेश या दोषारोपत्रासोबत दाखल आहे किंवा कसे. दोषारोपत्रात काय काय दाखल आहे याबाबत मला सांगता येईल. लेखी आदेशाबाबत दोषारोपपत्र पाहून मला सांगता येईल. दोषारोपपत्र पाहून साक्षीदाराने त्यात लेखी आदेश नसल्याचे सांगितले. हे म्हणणे खरे नाही की, वरिष्ठांचा लेखी आदेश नव्हता म्हणून तो दोषारोपत्रासोबत दाखल नाही. गुन्हयातील काही वाद मिळकतीची क्रमांक मला सांगता येतील. प्लॉट क्रं. १३, १४, १५, ७१४, ७१५, ७१६, ७१७, ७१८ व इतर प्लॉट होते.

३. या प्रकरणातील कलम दखल पात्र आहे. हे म्हणणे खरे आहे की, दखल पात्र गुन्हयात फिर्याद नोंदवून घेणे बंधनकारक असते. हे मला सांगता येणार नाही की, नि. क्रं. ९४ चा गुन्हा नोंद होण्यापूर्वी तशी कोणतीही तक्रार पोलिस स्टेशनला मिळाली नव्हती किंवा कसे. हे मला सांगता येणार नाही की, सदर गुन्हयापूर्वी त्याबाबत पोलिस स्टेशनला तक्रार प्राप्त झाली होती किंवा कसे. मी त्याबाबत तसा तपास केला नाही. हे म्हणणे खरे आहे की, घटनास्थळाच्या पूवेला – चांदवड – तिसगाव रस्ता व पश्चिमेला गणूर रस्ता आहे. हे म्हणणे खरे आहे की, सदर दोन्ही रस्ते वर्दळीचे आहे. हे मला आठवत नाही की, घटनास्थळाच्या आजूबाजूला शेत जमीन व त्यात लोकांची वस्ती आहे किंवा कसे. घटनास्थळाच्या बाजूला लभाण वस्ती आहे. हे मला आठवत नाही की, घटनास्थळाच्या बाजूला आदिनाथ नगर व डावखरनगर आहे किंवा कसे. हे म्हणणे खरे नाही की, गुन्हयाच्या तपासातील मला आज रोजी काहीही आठवत नाही. हे मला सांगता येणार नाही की, घटनासंदर्भाने मी घटनास्थळाच्या आजूबाजूच्या लोकांची बयाण नोंदवले किंवा कसे. मी कोणाकोणाचे जवाब नोंदवले त्यांची पूर्ण नावे मला सांगता येणार नाही. मला काही लोकांची नावे सांगता येतील. त्यात राजेंद्र डुंगरवाल, बिडगर, मोदी यांचे जवाब नोंदवले होते. दोषारोपपत्र पाहूण साक्षीदाराने घटनास्थळाच्या आजूबाजूंच्या लोकांचे बयाण नोंदवले नसल्याचे सांगितले. हे म्हणणे खरे आहे की, घटनेबाबत स्वतंत्र

साक्षीदारांचे बयाण नोंदवले नाही. साक्षीदार सांगतो की, कोणीही स्वयंसपूर्तीने आले नव्हते. मी त्यांच्याकडे गेलो होतो किंवा कसे हे मला सांगता येणार नाही. मला स्मृतीभ्रंश असल्याबाबत वैद्यकिय उपचार सुरु नाही.

४. हे म्हणणे खरे आहे की, ज्या गुन्हयात वाहनांचा वापर होतो त्या गुन्हयात सदर वाहन जप्त केल्या जाते. हे म्हणणे खरे आहे की, मी या गुन्हयात कोणतेही वाहन जप्त केले नाही. हे म्हणणे खरे नाही की, या प्रकरणात कोणतेही वाहन वापरुन गुन्हा केला नव्हता म्हणून कोणतेही वाहन जप्त केले नव्हते. उपप्रादेशीक परिवहन अधिका–याला कोणत्या वाहनाबाबत पत्र दिले होते ते मी पत्र पाहून सांगू शकतो. मी एक जे.सी.बी. व दोन टॅक्टर बाबत माहिती मागितली होती. हे म्हणणे खरे आहे की, पत्रामध्ये नमूद वाहनांचे क्रमांक एम. एच. ४९ डी ७४९६ व एम. एच. १५–९८४५ अपूर्ण आहे. हे म्हणणे खरे आहे की, अपूर्ण क्रमांक असल्याने उपप्रादेशीक परिवहन अधिका–याने त्या वाहनांबाबत मला कळविले नव्हते. हे म्हणणे खरे नाही की, त्या अपूर्ण क्रमांकाच्या वाहनांचे पूर्ण क्रमांक काय आहे व त्यांच्या मालकाबाबत मी तपास केला नव्हता. हे म्हणणे खरे नाही की, सदर वाहन वापरुन कोणताही गुन्हा केला नव्हता म्हणून वाहनाचे पूर्ण क्रमांक व मालकाचे नाव मला मिळून आले नव्हते.

५. भूमी अभिलेख कार्यालयाकडे वादातील प्लॉटबाबत घटनास्थळाची मोजणी करण्याकरीता पत्र दिले होते. हे म्हणणे खरे आहे की, मोजणी फी न भरल्याने तपासादरम्यान मोजणी झाली नव्हती. हे म्हणणे खरे आहे की, तक्रारदार याने तक्रारीत नमूद प्लॉटमधूनच उत्खनन झाले किंवा कसे याबाबत माहिती मिळण्याकरीता मी भूमी अभिलेख कार्यालयाकडे मोजणीबाबत अर्ज दिला होता. मला दिनांक ०७/१०/२०१३ रोजी भूमी अभिलेख कार्यालयाकडून पत्र मिळाले होते. हे म्हणणे खरे नाही की, दिनांक ०९/१०/२०१३ रोजी घटनास्थळी न जाता खोटा पंचनामा तयार केला आहे.

६. मी वस्तु – अ वरील छायाचित्र तयार करुन घेतले त्याबाबत बिल घेतलेले नाही. छायाचित्राचे मेमरीकार्ड जप्त केले नाहीमेमरीकार्ड घेतलेहॅश व्हल्यू तपासलेली नाहीछायाचीत्र काढणा–याकडून प्रमाणपत्र घेतले. मी मेमरीकार्ड जप्त केले नाहीमेमरीकार्ड घेतलेहॅश व्हल्यू तपासलेली नाहीछायाचीत्र काढणा–याकडून प्रमाणपत्र

घेतले नसल्याने त्याची मेमरीकार्ड जप्त केले नाहीमेमरीकार्ड घेतलेहॅश व्हल्यू तपासलेली नाहीछायाचीत्र काढणा–याकडून प्रमाणपत्र घेतले. मेमरीकार्ड जप्त केले नाहीमेमरीकार्ड घेतलेहॅश व्हल्यू तपासलेली नाहीछायाचीत्र काढणा–याकडून प्रमाणपत्र घेतले नाही. हे म्हणणे खरे नाही की, छायाचित्र घटनास्थळाचे नसल्याने मी मेमरीकार्ड जप्त केले नाही, मेमरीकार्ड घेतले नाही व हॅश व्हल्यू तपासलेली नाही तसेच छायाचीत्र काढणा–याकडून प्रमाणपत्र घेतले नाही.

७. मला साक्षीदार क्रं. १ अनिल शांतिलाल मोदी याने, ''विजय व शरद हे आमच्या प्लॉटपासून ३०० मीटर अंतरावर राहतात, नंदू त्यांच्यापुढे १०० ते १५० मीटर वर राहतात, बाकी लांब राहतात, आम्ही तहसिलदार कार्यालयात तोंडी तक्रार दिली, तसेच तहसिलदार व पोलिस निरीक्षक सोबत आम्ही जागेवर गेलो'' याबाबी मला जवाब देते वेळी सांगितल्या नव्हत्या.

८. मला साक्षीदार क्रं.२ राजेंद्र डुंगरवाल याने, ''त्यानंतर घटनास्थळी गेलो असता तिथे चाळीस ते पन्नास लोक हजर होते .......दुस–या दिवशी सुध्दा मुरुम काढण्याचे काम सुरु ठेवले''  याबाबी मला जवाब देते वेळी सांगितल्या नव्हत्या.

९. मला साक्षीदार क्रं.४ सोमनाथ जग्गनाथ खैरे याने, ''चौकशीअंती मला असे निष्पन्न झाले की आरोपी विजय कोतवाल व इतर यांनी विनापरवाना गौन खनीज म्हणजे मुरुम व माती यांची वाहतूक केलेली आहे तसेच उमाकांत धर्माधिकारी, अनिल धर्माधिकारी, स्वरुपचंद आबड, लताबाई बिडगर, रविंद्र विसपूते यांचा तक्रारी अर्ज आला होता. ''  याबाबी मला जवाब देते वेळी सांगितल्या नव्हत्या.

१०. मला साक्षीदार क्रं.५ अनिल नागेश धर्माधिकारी याने, '’"त्यावेळी मला डॉ. मोदी यांचे वॉचमनचा फोन आला की आपल्या खाजगी प्लॉटमध्ये विजय गणपत कोतवाल, नाना शिंदे व इतर चार–पाच जण होते, त्यांची नावे मला वयोमानाने आठवत नाही, माझा खाजगी प्लॉट गणूर रस्त्यावर प्लॉट क्रं. ५७१/१/५/६ आहे, त्यावेळी मला फोनवरुन आरोपींनी एक जेसीबी व २–३ ट्रॅक्टरच्या सहयाने गौण खणिजाचे उत्खनण केले होते असे कळाले'' तसेच, "मी त्यावेळी आरोपींना समजावून सांगण्याचा प्रयत्न केला की, शासनाच्या परवानगीशिवाय किंवा आमच्या परवानगी शिवाय उत्खनन

करता येत नसल्याचे सांगितले, त्यावेळी आरोपींनी गावाच्या विकासाच्या आड कोणी यायचे नाही अश्या धमक्या दिल्या'' तसेच "मी व माझ्या भावाने पोलिस स्टेशनमध्ये तक्रार दिली''या बाबी मला जवाब देते वेळी सांगितल्या नव्हत्या. साक्षीदाराने मला जवाब देते वेळी, अधोरखांकित भाग अ "दिनांक १७/०८/२०१३ रोजी मी व माझा भाउ चांदवड न्यायालयात काम बघत असतांना मिळकीत भागीदार अनिल मोदी यांचा मला फोन आला होता'' ही बाब सांगितलेली होती.

**११.** मला साक्षीदार क्रं.६ समीर अख्तर शेख याने, "मी त्यांच्यासोबत ढावकर नगर पुढे गणूर रस्त्यावर गेलो होतो'' ही बाब सांगितलेली नव्हती.

**१२.** मी या गुन्हयातील फिर्याद वाचली आहे. गुन्हयाच्या संदर्भाने तहसिलदारांकडे तक्रारदाराने दिलेला अर्ज मी तपासात हस्तगत केला नाही. हे म्हणणे खरे नाही की, आरोपींनी कोणताही गुन्हा केला नसतांना खोटा तपास केला व खोटे दोषारोपपत्र दाखल केले. हे म्हणणे खरे नाही की, सरतपासात संपूर्ण खोटे कथन केले आहे. हे म्हणणे खरे नाही की, आज खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास संपला.**
**फेरतपास काही नाही.**
सा.वा.दा.ब.अ.क.केले. समक्ष

Digitally signed by SUMIT SURESHCHANDRA CHHALLANI
Date: 2025.09.20 18:31:00 +0530

**(एस.एस.छल्लाणी)**
प्रथम श्रेणी न्यायदंडाधिकारी,
न्या.क्र.१, चांदवड.

Digitally signed by SUMIT SURESHCHANDRA CHHALLANI
Date: 2025.09.20 18:31:05 +0530

**(एस.एस.छल्लाणी)**
प्रथम श्रेणी न्यायदंडाधिकारी,
न्या.क्र.१, चांदवड.

**दिनांक – २०/०९/२०२५**